उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून 'विकसित महाराष्ट्र'च्या ध्येयाला बळ - मुख्यमंत्री फडणवीस >>पान 2

जंतर-मंतर आंदोलनाच्या समर्थनार्थ मेहकरात स्वाक्षरी आंदोलन >>पान 3

जनताच सरकारची खरी मालक : आ. सिद्धार्थ खरात >>पान 4

### सुविचार

श्रद्धा ही सामर्थ्यवान असते. कशावर तरी श्रद्धा ठेवल्याशिवाय माणूस जिवंत राहू शकत नाही.



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 08 ■ गुरूवार, दि. 23 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

अभिनेता अनुपम खेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा, 'ऑनर ऑफ अशोका अवॉर्ड २०२६'नं सन्मानित!

आतील पान

# दिल्लीत पुन्हा राडा, संसद मार्गावर पुन्हा दगडफेक!

## ACP भगत सिंह यांच्यासह ३ पोलीस कर्मचारी जखमी; अश्रू गॅसनंतर, पोलिसांचा लाठीचार्ज

**दैनिक आपला विदर्भ**

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीतील एनडीएमसी चौक आणि टॉल्स्टॉय मार्ग परिसरात बुधवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास पुन्हा एकदा उपद्रवी आंदोलकांकडून तुफान दगडफेक करण्यात आली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे दिसताच, दिल्ली पोलिसांनी तात्काळ लाठीचार्ज करत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. दरम्यान, काही उपद्रवी आंदोलक तलवारी आणि खुकरी घेऊन असल्याचेही दिसून आल्याचे समजते. दरम्यान या घटनेत काही पोलीस कर्मचार जखमी झाल्याचेही समजे.



**एसीपी भगत सिंह यांच्यासह तीन पोलीस कर्मचारी जखमी**

या भीषण दगडफेकीत कॅनॉट प्लेस पोलीस ठाण्याचे तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले असून यांत सहाय्यक पोलीस आयुक्त भगत सिंह यांचाही समावेश आहे. त्यांना उपचारासाठी तातडीने राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींवर उपचार सुरू आहेत. परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

**आंदोलनात उपद्रवी लोकांची घुसखोरी!**

दिल्ली पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'कॉकरोच जनता पार्टी'चे नेते आणि आंदोलनाच्या आयोजकांना गर्दीला शांत करण्याचे आवाहन करण्यात आले होते, मात्र आंदोलकांनी हे ऐकले नाही. गेल्या दोन दिवसांपासून रात्रीच्या वेळी बाहेरून आलेले उपद्रवी लोक आंदोलनात घुसून जाणीवपूर्वक तणाव वाढवत असल्याचेही पोलिसांनी म्हटले आहे.

सध्या टॉल्स्टॉय मार्ग आणि परिसरात दिल्ली पोलीस आणि रॅपिड ॲक्शन फोर्सचे जवान मोठ्या संख्येने तैनात आहेत. परिसराला छावणीचे रूप आले आहे. असून हिंसेमध्ये सहभागी असलेल्या उपद्रवींची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आज मंत्रालयात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आमदार जयंत आसगावकर, आमदार शिवाजीराव गर्जे, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख आदींसह उपमुख्यमंत्री कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दिवंगत पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी निलेश हरड, यांच्यासह मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## मनोज जरांगेंना जंतर मंतरवर विद्यार्थ्यांचा हिंदीत बोलायला आग्रह, जरांगे पाटील म्हणाले, मी हिंदीत बोललो तर तुम्ही तुमची हिंदी विसराल



नवी दिल्ली : जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत ही जागा सोडू नये. तुम्ही एकदा का ही जागा सोडलीत तर सरकार तुमचं आंदोलन मोडून काढेल, असा सल्ला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला. मनोज जरांगे यांनी बुधवारी दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या आंदोलनस्थळी जाऊन कॉकरोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपके यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मनोज जरांगे भाषणासाठी उभे राहिले तेव्हा याठिकाणी >>पान २

## खासदार विलीनीकरण प्रकरणात लोकसभा अध्यक्षांसह ६ बंडखोरांना नोटीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** उबाठा गटाच्या ६ खासदारांच्या शिवसेनेतील विलीनीकरणाला लोकसभा अध्यक्षांनी नुकतीच मंजुरी दिली होती. या निर्णयाविरोधात उबाठा गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर प्राथमिक सुनावणी घेत न्यायालयाने लोकसभा अध्यक्ष, लोकसभा सचिवालयाचे सचिव आणि संबंधित ६ खासदारांना नोटीस बजावली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व प्रतिवादींना उत्तर देण्यासाठी दोन आठवड्यांचा वेळ दिला असून, त्यानंतर पुढील सुनावणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीत उबाठा गटाचे ९ खासदार निवडून आले होते. त्यापैकी दोन-तृतीयांश म्हणजेच ६ खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. या विलीनीकरणाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अधिकृत मान्यता दिल्यानंतर लोकसभेत शिवसेनेचे संख्याबळ १३ वर पोहोचले, तर उबाठा गटाकडे ३ खासदार उरले. या निर्णयाला उबाठा गटाने राज्यघटनेच्या १० व्या अनुसूचीतील तरतुदींचा हवाला देत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

मूळ पक्षाचे विलीनीकरण झालेले नसताना, खासदारांच्या गटाचे विलीनीकरण कायदेशीर चौकटीत बसत नाही, असा उबाठा गटाचा दावा आहे. तर, २/३ पेक्षा जास्त लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन घेतलेला हा निर्णय घटनात्मक तरतुदींनुसारच असल्याचे शिवसेनेचे आणि सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील तातडीच्या स्थगितीची मागणी तूर्तास बाजूला ठेवत, सर्व पक्षांची बाजू आणि उत्तर ऐकण्यासाठी दोन आठवड्यांचा वेळ दिला आहे. त्यामुळे दोन आठवड्यांत येणाऱ्या उत्तरांनंतर सर्वोच्च न्यायालय या विलीनीकरणाच्या वैधतेबाबत काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण देशाचे आणि महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

## चेंबूर झाड दुर्घटनेप्रकरणी आझाद मैदानात मनसेचे आंदोलन; आयुक्तांना दिले निवेदन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे बुधवारी आझाद मैदानावर आंदोलन करण्यात आले. चेंबूर येथे झाड पडल्यामुळं झालेल्या विद्यार्थ्याच्या मृत्यू प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने जबाबदारी स्वीकारावी. संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावं अशी मागणी मनसेतर्फे यावेळी करण्यात आली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुंबई शहर अध्यक्ष संदीप देशपांडे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केलं.मनसे नेत्यांनी बीएमसीच्या उद्यान विभागाचे अधिक्षक जितेंद्र परदेशी यांच्या राजीनाम्याची मागणी केली. तसेच संबंधित कंत्राटदारावर केवळ दंड न करता त्यांना ब्लॅकलिस्ट करावं, अशी मागणीही संदीप देशपांडे यांनी केली. मानवी जीवाची किंमत इतकी स्वस्त होऊ शकते का? केंद्र सरकार असो राज्य असो किंवा स्थानिक प्रशासन असो सर्वत्र >>पान २

## शरद पवार-मोदी भेटीमुळे तर्कवितर्कांना उधाण

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी संसदेतील पंतप्रधान कार्यालयात (पीएमओ) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या अचानक झालेल्या भेटीमुळे राजकीय वतुर्ळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. दिल्लीत 'नीट' पेपरफुटीविरोधात सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ही भेट झाल्याचे सांगितले जात असले, तरी महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींची पार्श्वभूमी या भेटीला असल्याचे कळते.



संसदेतील पंतप्रधान कार्यालयात झालेल्या या भेटीची काही छायाचित्रे समोर आली असून, त्यामध्ये पंतप्रधान मोदी हे हसतमुखाने शरद पवार यांचे स्वागत करताना आणि गप्पा मारताना दिसत आहेत.

मंगळवारीच शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी जंतर-मंतरवर जाऊन अभिजीत दिपके यांच्यासह आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला होता. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकार आणि आंदोलक विद्यार्थ्यांमधील गतिरोध दूर करण्यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घेतला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. >>पान २

## नीट पेपरफुटी प्रकरणावरुन शरद पवार गट आक्रमक

**मुंबई । प्रतिनिधी :** नीट पेपरफुटी प्रकरणावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडून कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. पक्षाचे सर्व आमदार, खासदार, प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, फ्रंटल सेल अध्यक्षांनी आंदोलनात सहभागी होण्याचे शिंदे यांनी आदेश दिले आहेत.




## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा शुभारंभ

# सात जिल्ह्यांतील पात्र लाभार्थ्यांची प्रातिनिधिक यादी जाहीर-सहकार मंत्री पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्य शासनाने शेतकरी हितासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर केली आहे. या योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ करताना राज्यातील सात जिल्ह्यांमधील कर्जमुक्तीसाठी पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांच्या प्रातिनिधिक स्वरूपातील यादी जाहीर करीत आहोत असे बाबासाहेब पाटील यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रातिनिधिक स्वरूपात यादी जाहीर करीत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुमारे ५६ लाख पात्र शेतकरी कुटुंबांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या योजनेसाठी राज्य शासनाने भरीव आर्थिक तरतूद केली असून, ही प्रक्रिया पारदर्शक, सुलभ आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात आली आहे.

ही योजना केवळ कर्जमुक्तीपुरती मर्यादित नाही तर शेतकऱ्यांचा आर्थिक ताण कमी करून त्यांना नव्या जोमाने शेती करण्यास सक्षम बनविण्यासाठी असल्याचे सांगत सहकार मंत्री पाटील म्हणाले, सहकार विभाग सातत्याने यासाठी युद्धपातळीवर काम करीत आहे. २ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेस मंजुरी देण्यात आली होती. तसेच १५ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार योजनेच्या निकषांमध्ये अंशतः सुधारणा करण्यात आली.

योजनेतील कर्जमुक्ती आणि एकवेळ समझोता घटकाच्या अंमलबजावणी साठी राज्यातील ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १२ राष्ट्रीयकृत बँका आणि इतर खाजगी बँकांसह एकूण ५३ बँकांनी शेतकऱ्यांच्या




कर्जखात्यांची माहिती महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील सर्व कर्जखात्यांची माहिती सहकार विभागाच्या लेखापरीक्षकांकडून तपासण्यात आली आहे. योजनेंतर्गत अपात्र लाभार्थ्यांची माहितीही पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. त्यामध्ये आजी-माजी लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, शासकीय व निमशासकीय अधिकारी-कर्मचारी, शेतीबाह्य उत्पन्नावर आयकर भरणाऱ्या व्यक्ती तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, दूध संघ आणि बाजार समित्यांचे पदाधिकारी व कर्मचारी यांचा समावेश आहे. उपलब्ध माहितीचे संगणकीय विश्लेषण करून पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात सात जिल्ह्यांतील ५३२ पात्र लाभार्थ्यांची प्रातिनिधिक यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे संदेश पाठविण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, विविध कार्यकारी सहकारी संस्था आणि संबंधित बँक शाखांमध्येही प्रसिद्ध करण्यात येणार आहेत, अशी माहितीही सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी यावेळी दिली.

प्रत्येक लाभार्थ्याला स्वतंत्र विशिष्ट क्रमांक देण्यात येणार असून, आधार क्रमांक किंवा त्या विशिष्ट क्रमांकाच्या आधारे आपले आधार प्रमाणीकरण करावे असे आवाहन करीत सहकार मंत्री >>पान २

## खासगी क्लासेसच्या चढाओढीतून पेपरफुटीचे प्रकार

सुशिक्षित तरुणांची लोकसंख्या हे बिरुद मिरवून घेणाऱ्या भारतासारख्या तरुण देशात नीट पेपरफुटी प्रकरणानंतर सुरू झालेले आंदोलन हे केंद्र सरकारसमोरचे सर्वात मोठे आव्हान ठरताना दिसते आहे. शिक्षण पद्धतीत अमूलाग्र बदलाची मागणी हा आंदोलनाच्या केंद्रबिंदु स्थानी असली तरी यात सहभागी होणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांपेक्षा हे आंदोलन अराकता सरवणाऱ्यांचे हेतू साध्य करेल का, असा प्रश्न आता उपस्थित होतोय. दिल्लीत जंतरमंतरवरुन संसदेकडे निघालेल्या मोर्चात सहभागी असलेल्या आंदोलकांनी केलेल्या दगडफेकीने आणि या आंदोलकांवर दिल्ली पोलीस आणि निम लष्करी दलाने केलेल्या लाठीमाराच्या कारवाईनंतर हा मुद्दा आता थेट नेपाळ, बांगलादेशातील क्रांतीकार्याशी जोडला जातो आहे. जगभरातही या आंदोलनाकडे याच दृष्टीने पाहण्यात येईल. पंतप्रधानपदी गेल्या १२ वर्षांपासून विराजमान असलेल्या नरेंद्र मोदी सरकारसमोरची ही सर्वाच मोठी परीक्षा मानली जाईल. मात्र या उद्रेकाची मूळे ही शिक्षण व्यवस्थेत गेल्या काही दशकांमध्ये झालेल्या बदलांतून आहे, हे वास्तव स्वीकारायला हवे. २१वं शतक सुरु होण्यापर्यंत देशात शिक्षणासाठी होणारा खर्च हा सर्वसामान्यांना परवडणारा होता. देशातील सरकारी शाळा आणि महाविद्यालयांतील शिक्षणाचा दर्जा हा उत्तम होता, त्यातून रोजगाराच्या संधीही उपलब्ध होत होत्या. १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतर, देशाच्या अर्थव्यवस्थेला मिळालेल्या उभारीत उच्च तंत्रशिक्षण, आयटी प्रोफेशनल्स, परदेशात शिक्षण आणि नोकऱ्यांच्या संधी, आयआयटी-आयआयएम, याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या सगळ्यात शिक्षण क्षेत्रातील स्पर्धा वाढीस लागली. चांगल्या गुणांसाठी पालकांचा विद्यार्थ्यांवर दबाव वाढू लागला आणि त्यातून शाळेतील शिक्षणापेक्षा अधिक म्हणून कोचिंग क्लासचे महत्त्व वाढीस लागले. शहरांमध्ये दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा सुरु होण्यापूर्वीच क्लासेसच्या माध्यमातून अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर देण्याचे प्रकार सुरु झाले, यातून या खासगी क्लासेसचे पेव फुटले. आधी सरकारी शाळांमधील शिक्षकच शाळेतील मुलांसाठी त्यांच्या घरी किंवा शाळांतच अधिकचे क्लास चालवित असत, त्यासाठी आकारण्यात येणारी फी ही अत्यंत मर्यादित स्वरुपाची होती. मात्र खासगी क्लासेसचे पेव फुटू लागल्यानंतर त्यांची फी आकारणी ही हजारांच्या आकड्यात खेळू लागली. आपल्या मुलांना चांगल्या संधी भविष्यात उपलब्ध व्हाव्यात, वाढत्या इंग्रजी शाळांच्या स्पर्धेत मुलांचा टिकाव लागावा, यासाठी पालकही मुलांसाठी गुंतवणूक म्हणून मोठी रक्कम देवू लागले. यातून घडले असे की शिक्षणाची मोठी बाजारपेठच उभी राहिली. महाराष्ट्राचा विचार केला तर पुणे, लातूर यासारखी शहरे शिक्षणाची बाजारपेठ म्हणून विकसीत होऊ लागल्या. गेल्या तीन चार दशकांत या ठिकाणी महाराष्ट्रातून येणारे विद्यार्थी, त्यांच्यासाठीच्या शिक्षण संस्था, कोचिंग क्लासेस, राहण्याच्या खोल्या, त्यांच्या भोजनासाठीच्या खानावळी यातून एक परस्पर अवलंबित्व असणारी अर्थव्यवस्थाच विकसीत झाली. हाच प्रयोग किंवा अशाच बाजारपेठा आयआयटीसाठी देशात कोटा, तर आयएएस होण्यासाठी दिल्लीत राजेंद्र नगर यासारख्या परिसरात विकसीत होत गेल्या. कसेही करुन आपल्या पाल्याचा प्रवेश इंजिनिअरिंग, डॉक्टरकी, आयआयटीत व्हावा यासाठी पालकांनी त्यांची घरे-दारे विकून, प्रसंगी कर्जे काढून ही बाजारपेठ अधिक विकसीत करण्यात हातभारच लावला. घरातील एखाद्या मुला-मुलीचे शिक्षण हे त्या घरातील सर्वांच्याच आयुष्याचा क्रम बदलणारे ठरु लागले. यातून प्रसंगी स्थलांतरेही घडली. याच सगळ्या गदारोळात परदेशात जाऊन शिक्षण घेण्यासाठी शालेय अभ्यासक्रमासोबतच जीआरइ सारख्या परीक्षांची तयारी, त्यातून पूर्व परीक्षांचा अभ्यास असा एक वेगळाच प्रांत उभा राहिला. आता तर १० वी आणि १२ वी च्या गुणांना किंमतच उरलेली नसून, प्रत्येक क्षेत्रात प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सीईटींना म्हणजेच पूर्वपरीक्षांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे, यातून शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या शिक्षणाचे महत्त्व याच रचनेने कमी केले. शाळेत मिळणाऱ्या शिक्षणाचे महत्त्व कमी वाटू लागल्याने पाल्याला इतर पर्यायंतून म्हणजेच खासगी क्लासेसमधून शिक्षण देण्याची चढाओढच पालकांमध्ये आणि समाजात निर्माण झाली. यातून गुणांवर अवलिंबत्व वाढल्याने विद्यार्थ्यांचं बालपण संपून ते पूर्णपणे घडाळ्यांच्या काट्यांवर जगणारे प्राणी झाले. गुण हाच यशस्वीतेचा एकमेव निकष झाल्याने जो परीक्षांत यश मिळवतो गुणवंत आणि जो परीक्षेत गुम मिळवू शकत नाही, तो अपयशी अशी नवी व्याख्या निर्माण झाली. जे विद्यार्थी या स्पर्धेत टिकू शकले नाहीत ते यातून मागे पडले आणि त्यांच्या इतर गुणांकडेही दुर्लक्षच देण्यात आले. ही गुणांची स्पर्धा इतकी तीव्र झाली की १०० टक्के मिळवणाऱ्यांमध्येही स्पर्धा निर्माण झाल्याचे आपण गेल्या काही काळापासून पाहतो आहोत. या स्पर्धेत टिकायचे आव्हान केवळ विद्यार्थी आणि पालकांपुढेच नसून ते ज्या खासगी कोचिंग क्लासेसमध्ये जातायेत त्यांच्यापुढेही उभे राहिले. २१ व्या शतकापूर्वी शाळेत बोर्डात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरुन शाळेची गुणवत्ता ठरत होती, ती आताच्या काळात खासगी क्लासेसच्या गुणवत्तेला लागू झाली. यातून हुशार मुले क्लासेसमध्ये यावीत यासाठी तसेच त्यांच्यासाठी जास्त प्रयत्न करण्याची स्पर्धा क्लासेसमध्येही निर्माण झाली. शाळांमध्ये असतात तशा गुणवत्तेच्या आधारावर तुकड्यांची प्रथाही क्लासेसमध्ये उभी राहिली. दुसऱ्या क्लासपेक्षा आपल्याकडे हुशार शिक्षक आणि हुशार विद्यार्थी असावेत, याचे पेव फुटले. दरवर्षी अधिक प्रवेश मिळवण्यासाठी जाहिरातींवर खर्च वाढला. आणि यशाचं सातत्य टिकवण्याच्या प्रयत्नात पेपरफुटीसारखे प्रकारही क्लासेसकडून घडू लागले. तरुणांची प्रचंड संख्या असलेल्या भारतासारख्या देशात मर्यादित संधी उपलब्ध असल्याने पूर्व परीक्षांत चांगले यश मिळवण्यासाठी आणि त्यातून प्रवेश निश्चितीसाठी लाखो विद्यार्थी अशा क्लासेसमध्ये जातात. या क्लासेसनी यश वाढवण्यासाठी गैरमार्ग निवडून पेपरफुटीसारखे प्रयोग करण्यास सुरुवात केली. विद्यार्थ्यांनाही हा पर्याय योग्य वाटला, त्यांच्या पालकांनीही लाखो रुपये टाकून असे पेपर मिळवले आणि त्यातून पेपरफुटीसारख्या प्रकरणात खासगी क्लासेस आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेत पेपर सेट करणाऱ्या शिक्षकांचे संबंध, त्यांची त्या ठिकाणी करण्यात येणारी नियुक्ती असा एक भयंकर मोठा प्रकारच नीट पेपरफुटीच्या निमित्ताने समोर आला. खासगी क्लासेसच्या या चढाओढीतून पेपरफुटीसारखे प्रकार समोर आल्यानंतर, केंद्र सरकारने परीक्षा रद्द केली. या पेपरफुटी प्रकरणात अटकसत्र राबवण्यात आले. देशभरात याचे असलेले जाळे शोधण्याचा आणि पुर्नपरीक्षा घेऊन परिस्थिती सुरळीत करण्याचा प्रयत्न सरकारने केला. मात्र या कृतीतून जनतेत मात्र सरकारच्या अकार्यक्षमतेचा संदेश गेला.

# उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून 'विकसित महाराष्ट्र'च्या ध्येयाला बळ - मुख्यमंत्री फडणवीस

## पुणे जिल्ह्यातील मावळ व खेड परिसरात 'शुभ आरंभ' उपक्रमातून उल्लेखनीय परिवर्तन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सर्वसमावेशक विकासाच्या धोरणाला उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रभावी साथ लाभत आहे. शासन आणि उद्योग क्षेत्राच्या भागीदारीतून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साध्य होत आहे. अशा उपक्रमांमुळे 'विकसित महाराष्ट्र २०४७' या राज्याच्या ध्येयाला बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांना पूरक ठरणारे उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्वाचे उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवत आहेत. आरोग्य, पोषण, जलसुरक्षा, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि शालेय पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण काम करणारे उपक्रम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. मोंडेलेज इंडियाच्या 'शुभ आरंभ' या प्रमुख सामाजिक उपक्रमांतर्गत गेल्या १३ वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील मावळ आणि खेड तालुक्यातील ६० गावांमध्ये स्थानिक गरजांनुसार आरोग्य, पोषण, शिक्षण, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि समुदाय विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे हजारो कुटुंबांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून आला असून, शासनाच्या विविध योजनांनाही प्रभावी पूरक बळ मिळाले आहे.

आरोग्य क्षेत्रात आयुष्मान भारत अभियानाशी सुसंगत पद्धतीने ५० हेल्थ अँड वेलनेस सेंटरचे आधुनिकीकरण व सक्षमीकरण करण्यात आले असून, त्याचा सुमारे ३.२ लाख नागरिकांना थेट लाभ झाला आहे. ॲनिमियामुक्त भारत अभियानाअंतर्गत महिलांमध्ये आणि किशोरवयीन मुलींमध्ये रक्तक्षय ओळखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या माध्यमातून सुमारे ५ हजार उच्च जोखमीच्या गर्भवती महिलांची ओळख करून त्यांना विशेष उपचारासाठी संदर्भित करण्यात आले, तर एक हजारांहून अधिक पाच वर्षांखालील बालकांना प्रगत उपचारासाठी पाठविण्यात आले. २२६ आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन नवजात बालकांची घरपोच आरोग्य तपासणी, उच्च जोखमीच्या रुग्णांची ओळख आणि प्राथमिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यात आली. आरोग्य जनजागृतीसाठी विविध विशेष आरोग्य शिबिरे तसेच जागतिक आरोग्य, क्षयरोग, मातृत्व आणि योग दिन साजरा करण्यात आला.

'खेलो इंडिया' अभियानाशी सुसंगत 'शुभ आरंभ स्पोर्ट्स फॉर एक्सलन्स' या उपक्रमातून ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्याचे काम करण्यात आले आहे. फुटबॉल आणि कबड्डीसारख्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांना नियमित प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक, जीवनकौशल्य प्रशिक्षक आणि स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या दशकात सुमारे ९ हजार विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रशिक्षणाचा लाभ मिळाला असून, त्यामध्ये मुलींचा सहभाग जवळपास ५० टक्के आहे. परिसरात १० क्रीडांगणे विकसित करण्यात आली आहेत. शालेय स्तरापासून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचे कार्य सुरू आहे.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. २७ आरओ पाणी शुद्धीकरण यंत्रणा, १२ स्वच्छतागृहे अनेक शाळांमध्ये संरक्षक भिंती, पेव्हिंग ब्लॉक आणि अन्य सुविधा उभारण्यात आल्या आहेत. हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी ६० किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून, त्यामुळे ग्रामपंचायतीच्या वीज खर्चात दरवर्षी मोठी बचत होत आहे.



तसेच विविध वाड्यांमध्ये सौर पथदिवे बसविण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेतही वाढ झाली आहे.

जलसंधारण क्षेत्रात सहा जलसाठा संरचनांची निर्मिती व दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे २,००० लाख लिटर अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे. याचा लाभ ३०० एकरांहून अधिक शेती आणि ५०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना झाला आहे. याशिवाय, पुढील दोन वर्षांत २० हून अधिक नवीन जलसंधारण प्रकल्प उभारून सुमारे २,५०० लाख लिटर भूजल पुनर्भरण क्षमता निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये शेततळी, बंधारे, बोअरवेल रिचार्ज आणि पर्जन्यजल संधारणासारख्या उपाययोजनांचा समावेश आहे.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये सकस आहार आणि आरोग्यदायी जीवनशैलीची सवय निर्माण करण्यासाठी पुणे, सिंधुदुर्ग आणि मुंबई जिल्ह्यातील २३५ शाळांमध्ये पोषण शिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या माध्यमातून सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांपर्यंत सुरक्षित आणि सकस आहाराचा संदेश पोहोचविण्यात आला.

४७० शिक्षकांना 'हेल्थ अँड वेलनेस ॲम्बेसेडर' म्हणून प्रशिक्षित करण्यात आले असून, सर्व शाळांमध्ये 'सेहत क्लब' स्थापन करण्यात आले आहेत. अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि पोषणविषयक जनजागृतीसाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे.

या उपक्रमाचा पुढील टप्पा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, हेल्थ अँड वेलनेस सेंटरची गुणवत्ता वाढविणे, विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन, ग्रामीण क्रीडा विकासासाठी प्रगत प्रशिक्षण, तसेच जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणाच्या नव्या प्रकल्पांची अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात येणार आहे. शासनाच्या विविध योजनांशी प्रभावी समन्वय साधत ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य, शिक्षण, जलसुरक्षा आणि जीवनमानात शाश्वत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राज्यासाठी आदर्श ठरत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकनासाठी पुढाकार घ्यावा - मंत्री पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील कायम विना अनुदानित महाविद्यालयांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दृष्टीने नॅक मूल्यांकनास प्राधान्य द्यावे, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अपार आयडी, एबीसी आयडी नोंदणी आणि इंटर्नशिप उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत(दादा) पाटील यांनी केले.

राज्यातील कायम विना अनुदानित महाविद्यालयांच्या विविध प्रश्नांबाबत मंत्रालयात मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक झाली. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर प्रमुख उपस्थित होते. बैठकीस महाराष्ट्र राज्य विना अनुदानित महाविद्यालय संघाच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून विविध प्रश्न मांडले.

बैठकीत राज्यातील एकूण ३,८२९ महाविद्यालयांपैकी २,५९८ विना अनुदानित आणि १,२३१ अनुदानित महाविद्यालये असल्याची माहिती देण्यात आली. ग्रामीण भागातील महाविद्यालयांना



पीएच.डी./नेट/सेट अर्हताधारक शिक्षकांची उपलब्धता, विद्यापीठांना भरावे लागणारे वार्षिक संलग्नीकरण शुल्क, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेत न मिळणे, तसेच त्यामुळे महाविद्यालयांवर येणारा आर्थिक ताण आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील यांनी सांगितले की, या सर्व विषयांवर २४ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (एमएसएफडीए), पुणे येथे आयोजित राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरू व प्र-कुलगुरू यांच्या बैठकीत सविस्तर चर्चा करून आवश्यक निर्णय घेतले जातील.

विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये नॅक मूल्यांकनाचे प्रमाण समाधानकारक नसल्याबद्दल चिंता व्यक्त करत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि राष्ट्रीय स्तरावर अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी सर्व महाविद्यालयांनी तातडीने मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तिसऱ्या वर्षातील अंमलबजावणीच्या पार्श्र्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपच्या संधी वाढविणे, तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान प्रत्येक विद्यार्थ्याचे अपार आयडी आणि एबीसी आयडी तयार करण्यासाठी महाविद्यालयांनी विशेष मोहीम राबवावी, असे आवाहनही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## अभिनेता अनुपम खेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा, 'ऑनर ऑफ अशोका अवॉर्ड २०२६'नं सन्मानित!

**मुंबई । प्रतिनिधी :** हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेता अनुपम खेरच्या प्रदीर्घ आणि समृद्ध कारकिर्दीचा आणखी एकदा गौरव झाला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदान तसेच समाजासाठी केलेल्या कार्याची दखल घेत प्रतिष्ठित 'ऑनर ऑफ अशोका अवॉर्ड २०२६'नं त्याला सन्मानित करण्यात आलंय. आपल्या दमदार अभिनयानं आणि वैविध्यपूर्ण भूमिकांनी गेल्या चार दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या अनुपम खेरच्या शिरपेचात या पुरस्कारामुळं आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

पान १ वरून...

## मनोज जरांगेंना जंतर मंतरवर

असलेले अनेक अमराठी विद्यार्थी त्यांना हिंदीत बोलण्याचा आग्रह करत होते. मात्र, अभिजीत दिपके हे मनोज जरांगे मराठीत काय बोलतात, त्याचे भाषांतर करुन विद्यार्थ्यांना सांगत होते. तरीही काही विद्यार्थी मनोज जरांगे यांना हिंदीत बोलायचा आग्रह करत होते. यावर मनोज जरांगे यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत मिश्कील टिप्पणी केली. काय वेळ आलेय, मी मराठीत बोलतोय आणि हे हिंदीत सांगायले. मला हिंदी येत नाही, तोच प्रॉब्लेम आहे. पण मी हिंदी बोललो तर तुम्ही तुमचं हिंदी विसरुन जाल, असे जरांगे यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यावर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. यावेळी मनोज जरांगे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून मी इथे आलो आहे. भाजप सरकार प्रत्येकवेळी गोरगरीब लोकांच्या लेकरांवर अन्याय करते. या पुढच्या काळात सरकारने विद्यार्थ्यांवर हात उचलला तर प्रयत्न यांचं महाराष्ट्रातील फिरण पूर्ण बंद होणार आणि यांचा माज पूर्ण उतरवल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.आम्ही देखील आंतरवाली सराटीला आंदोलन केले होते. तिकडेही गोरगरीबांच्या लेकरांवर, मायमाऊली, मुलींना आणि वृद्ध माणसांवर पोलिसांनी प्राणघातक हल्ला केला होता. आमच्यावर गोळ्या घातल्या होत्या. माझी विद्यार्थ्यांना एकच विनंती, तुम्ही फक्त ही जागा सोडू नका. आम्ही सगळा देश तुमच्यामागे आहे, तुम्ही दुसरीकडे गेलात तर आंदोलन मोडून टाकतील. हे सरकार आपण निवडून दिले आहे.

हेच आज आपल्या लेकराबाळांवर उलटलेत, त्यांना उलटं करायची ताकद विद्यार्थ्यांमध्ये आणि गोरगरीब जनतेमध्ये आहे, हे त्यांच्या ध्यानात नाही, असे जरांगे पाटील यांनी म्हटले.

## चेंबूर झाड दुर्घटनेप्रकरणी

निष्काळजीपणाचा कळस सुरू आहे. झाड पडून निष्पाप मुलांचा मृत्यू होत आहे. एवढे मोठे झाड पडून एकाचा जीव जात आहे.

त्याची जबाबदारी कोणीही घेत नाही. अशावेळी याची जबाबदारी ही महानगरपालिकेने निश्चित करायला हवी. आता आम्ही महानगरपालिकेच्या समोर आंदोलन करत आहोत. उद्या महानगरपालिकेच्या आत येऊन आंदोलन करू, असा इशारा यावेळी संदीप देशपांडे यांनी दिला.

मोठ्या प्रकल्पांचं श्रेय घेण्याची स्पर्धा : आंदोलनामध्ये व्यवस्थेला प्रश्न विचार, कर्तव्य करा अन्यथा खुर्ची सोडा, अधिकाऱ्यांना निलंबित करा, अशा प्रकारच्या घोषणा आंदोलकांनी दिल्या. दुसरीकडं मनसे नेते नितीन सरदेसाई म्हणाले की, झाड पडणं असो, मॅन होलमध्ये पडून व्यक्तीचा मृत्यू असो किंवा अशा प्रकारच्या घटना महाराष्ट्रात देशात घडत आहेत. याची जबाबदारी न स्वीकारण्याची पायंडा सगळीकडे पडला आहे. मोठ्या प्रकल्पांचे श्रेय घेण्याची स्पर्धा सर्वांमध्ये लागलेली आहे. या परिस्थितीकडे लक्ष वेधण्यासाठी आणि सरकारला जबाबदारी स्वीकारण्यास भाग पाडण्यासाठी आम्ही आंदोलन करत आहोत. सत्तेला आणि प्रशासनाला जाग यायलाच हवी,'' असंही ते म्हणाले.

आयुक्तांनी दिलं चौकशीचं आश्वासन : आयुक्तांची भेट घेतल्यानंतर संदीप देशपांडे म्हणाले की, आम्ही सुचवलेल्या गोष्टींवर दोन दिवसात चौकशीचं आश्वासन आयुक्तांनी दिलं आहे. आयुक्त वेगळी समिती नेमून अहवाल तयार करणार असल्याचं म्हणाले.

काय आहे घटना ? : मुंबईतील चेंबूर येथील पहिल्याच पावसात डायमंड गार्डनजवळ ३० जून २०२६ रोजी शाळेच्या बसवर पिंपळचा वृक्ष मुळासकट उन्मळून पडला होता. या दुर्घटनेत एका ११ वर्षीय शाळकरी मुलाचा मृत्यू झाला होता. तर काही विद्यार्थी जखमी झाले होते.

## शरद पवार-मोदी भेटीमुळे

नीट पेपरफुटीप्रकरणी मार्ग काढणे आणि भविष्यातील उपाययोजनांबाबत

दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, या भेटीदरम्यान शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांना राज्यातील कृषी आणि जलक्षेत्रातील परिस्थितीबाबत पत्र सुपूर्द केले. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, बाधित कुटुंबांना आर्थिक मदत द्यावी आणि मानसिक आरोग्य सहाय्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील सिंचन प्रकल्पांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी 'थर्ड पार्टी ऑडिट' करावे, रखडलेले प्रकल्प तातडीने पूर्ण करावेत आणि केवळ किमान आधारभूत किंमत (एमएसपी) जाहीर न करता शेतकऱ्यांना 'एमएसपी'चा कायदेशीर अधिकार द्यावा, या मुद्द्यांकडे पत्रातून लक्ष वेधण्यात आले आहे. याशिवाय, पीकविमा योजनेतील त्रुटी दूर करून नुकसानभरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी आणि निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही पवारांनी पंतप्रधानांकडे केली.

या भेटीवर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे म्हणाले की, पवार साहेब काल विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी जंतर-मंतरवर गेले होते. त्यामुळे या समस्येवर योग्य मार्ग निघावा आणि विद्यार्थ्यांवरील कारवाई थांबावी, याच उद्देशाने ही भेट झाली असावी. त्यापलीकडे या भेटीत कोणताही राजकीय हेतू दडलेला नाही, असे स्पष्टीकरण शिंदे यांनी दिले.

## सात जिल्ह्यांतील पात्र लाभार्थ्यांची

म्हणाले, राज्यातील सुमारे ३२ हजार आपले सरकार सेवा केंद्रां मार्फत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, त्यापूर्वी शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक वर नोंदणी करणे आवश्यक राहणार आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात लाभाची रक्कम डीबीटी द्वारे थेट जमा करण्यात येणार आहे.

राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांतील पात्र लाभार्थ्यांची प्रक्रिया ३१ जुलै २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, त्यानंतर व्यापारी बँकांतील पात्र लाभार्थ्यांना लाभ हस्तांतरणाची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाचे सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे तसेच सहकार विभागाची संपूर्ण यंत्रणा सातत्याने आढावा घेऊन जिल्हास्तरावर आणि बँकांच्या स्तरावर नियोजन करत आहेत. अत्यल्प कालावधीत ही महत्त्वाकांक्षी योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी सहकार विभाग समर्पित भावनेने कार्य करत आहे, अशा शब्दात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विभागाचे अभिनंदन केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

महत्त्वाचे...

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीअंतर्गत बाल रुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच आर्थिक सहाय्य

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. महागड्या निदान चाचण्यांमुळे उपचार प्रक्रियेत होणारा विलंब टाळून कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. या विशेष उपक्रमांतर्गत राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांना निदानासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या लाभाअंतर्गत ० ते १८ वयोगटातील पात्र बालरुग्णांना कर्करोगाचे निदान निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक तसेच पुढील खर्चिक वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. या सहाय्यामुळे आर्थिक अडचणींमुळे निदान प्रक्रियेत होणारा विलंब टाळून वेळेत निदान आणि उपचाराचे प्रभावी नियोजन करणे शक्य होणार आहे.

पहिल्या दोन महिन्यांतच ५९ बालरुग्णांना ५० लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले आहे. या सर्व बालरुग्णांचे कर्करोग निदान टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यात आले. बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच सुरू करण्यात आलेला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे. वेळेत निदान झाल्यामुळे उपचाराला होणारा विलंब कमी होऊन बालरुग्णांना योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा लाभ राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या २०० लाभार्थ्यांपैकी आतापर्यंत ५९ बालरुग्णांना निदानासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. गरजू रूग्णांनी अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक १८००१२३२२११ वर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे ६० टक्के उपचार शासकीय रुग्णालयांतच व्हावेत -सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत किमान ६० टक्के उपचार शासकीय आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातूनच झाले पाहिजेत, असे स्पष्ट निर्देश देत सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले राज्य आरोग्य हमी योजनेचा जास्तीत जास्त निधी शासकीय रुग्णालयांकडे वळविल्यास शासकीय आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आरोग्य हमी सोसायटीची आढावा बैठक सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाचे आयुक्त डॉ. सुनील भोकरे उपस्थित होते. तर राज्यातील सर्व क्षेत्रीय व्यवस्थापक आणि जिल्हा समन्वयक दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

मंत्री आबिटकर म्हणाले, महात्मा फुले जनआरोग्य योजना ही खाजगी रुग्णालयकेंद्रित नसून जनताकेंद्रित योजना आहे. त्यामुळे नागरिकांना शासकीय आरोग्य संस्थांच्या माध्यमातूनच या योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळाला पाहिजे. शासनाच्या आरोग्य योजनांचा अधिकाधिक निधी शासकीय रुग्णालयांकडे वळल्यास आरोग्य विभागाची अंतर्गत यंत्रणा अधिक बळकट होईल. यासाठी क्षेत्रीय व्यवस्थापक आणि जिल्हा समन्वयकांनी प्रभावीपणे काम करून जिल्हा शल्यचिकित्सक व संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय ठेवावा. तसेच शासकीय रुग्णालयांतील क्लेम मंजुरीतील अडचणी तातडीने दूर करून योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि शासकीय आरोग्य संस्थांचे बळकटीकरण यावर विशेष भर देत प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत गुणवत्तापूर्ण व मोफत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी आणि आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्य यंत्रणेतील सर्वच घटकांनी संवेदनशीलपणे व समन्वयाने काम करावे, असे आवाहनही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

# जंतर-मंतर आंदोलनाच्या समर्थनार्थ मेहकरात स्वाक्षरी आंदोलन

## विद्यार्थ्यांवर लाठी, सरकारचा निषेध! उठावाच्या घोषणांनी मेहकर दणाणले

दैनिक आपला विदर्भ











**मेहकर । प्रतिनिधी :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांकडून सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत मेहकर शहरातील जिजाऊ चौकात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) स्वाक्षरी मोहीम आंदोलन राबविण्यात आली सदर आंदोलनामध्ये महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सुद्धा सहभाग नोंदवला होता. या आंदोलनात विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना जाहीर पाठिंबा दर्शविला.

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारने संवेदनशीलतेने लक्ष द्यावे, संवादाच्या माध्यमातून प्रश्न सोडवावेत आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारची दडपशाही होऊ नये, अशी मागणी करण्यात आली. उपस्थितांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलना दरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जचा तीव्र निषेध व्यक्त केला.

आंदोलक विद्यार्थी गुन्हेगार नसून आपल्या हक्कांसाठी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणारे देशाचे भावी नागरिक असल्याचे यावेळी वक्त्यांनी नमूद केले.

वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता लक्षात घेऊन शासनाने विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांची तातडीने दखल घ्यावी आणि सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. लोकशाही मूल्यांचा सन्मान राखत विद्यार्थ्यांशी संवाद साधून प्रश्न सोडविण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

या स्वाक्षरी मोहिमेत आमदार सिद्धार्थ खरात, मेहकर नगरपरिषद चे नगराध्यक्ष किशोर गारोळे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवा सेना तालुका अध्यक्ष अँड.आकाश घोडे, नगरसेवक महेश रिंढे, नितीन तुपे, प्रा. सतीश ताजणे, नगरसेवक अमर घोडे, अँड संदीप गवई, गोपाल गायकवाड, निसार अन्सारी यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, विद्यार्थी, युवक आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले.

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा व्यक्त करत, आंदोलक विद्यार्थ्यांवरील लाठी चार्ज सह कारवाईचा निषेध केला. विद्यार्थ्यांशी संघर्षाचा नव्हे तर संवादाचा मार्ग स्वीकारून शासनाने त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## तुमच्यामुळेच मी राजकारणात पाऊल टाकले, अमोल कोल्हे भावूक; दिलीप सोपलांना एका वाक्यातच व्यक्त केले सारे



**मुंबई । प्रतिनिधी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांची आज पहिलीच जयंती.

सहा महिन्यांपूर्वी अजित पवारांचे विमान दुर्घटनेत अकाली निधन झाले. २८ जानेवारीच्या सकाळी सकाळी अवघ्या महाराष्ट्राची झोप उडवून देणारी घटना माध्यमांतून समोर आली, ती म्हणजे अजित पवारांचे निधन. बारामतीजवळ अजित दादांचे विमान क्रॅश झाले अन् अवघा महाराष्ट्र सुन्न झालं, सोशल मिडिया भावूक झाला, अनेकांच्या डोळे पाणावले, बडे नेतेही धाय मोकलून रडू लागले. आज २२ जुलै रोजी अजित पवारांचा सर्वत्र वाढदिवस साजरा केला जायचा. मात्र, आज त्यांची जयंती साजरी होत असल्याने अनेक नेते भावूक झाले आहेत, अनेक नेत्यांनी दादांच्या आठवणी जागवल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी अजित पवारांची आठवण सांगत आपल्या राजकीय प्रवेशाचे कारण अजित दादा तुम्हीच होतात, असे म्हटले. तर, ज्येष्ठ नेते तथा ठाकरेंच्या शिवसेनेतील बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनीही अजित दादांची उणीव शब्दात व्यक्त करता येणार नसल्याचे म्हटले.

## शेतकरी कुटुंबातील विनायक काकड समाजकार्यात (बी.एस.डब्ल्यू.) पदवीधर; जिद्दीच्या बळावर गाठला यशाचा टप्पा





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** प्रतिकूल परिस्थिती ही यशाच्या वाटेतील अडथळा नसून, जिद्द आणि चिकाटी असेल तर तीच प्रेरणा ठरते, याचे उदाहरण लोणार तालुक्यातील चिखला काकड येथील विनायक द्वारका लक्ष्मी जगन्नाथ काकड यांनी घालून दिले आहे. शेतकरी कुटुंबातून आलेल्या विनायक यांनी मुंबईतील नामांकित निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्क येथून समाजकार्यात (बी.एस.डब्ल्यू.) पदवी यशस्वीरीत्या संपादन केली.

नुकत्याच महाविद्यालय परिसरात पार पडलेल्या पदवीदान समारंभात महाविद्यालयाच्या अध्यक्षा फिलोमिना सेक्वेरिया यांच्या हस्ते त्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

विनायक काकड हे लोणार तालुक्यातील चिखला काकड गावातील शेतकरी कुटुंबातील आहेत. वडिलांच्या अकाली निधनानंतर घरातील एकुलता एक मुलगा असल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. मात्र, या जबाबदाऱ्या समर्थपणे पेलत त्यांनी आपल्या शिक्षणात कोणताही खंड पडू दिला नाही. संकटांवर मात करत त्यांनी शिक्षणाची वाट अखंड सुरू ठेवली.

समाजकार्य ही केवळ पदवी नसून समाजातील वंचित, उपेक्षित आणि दुर्बल घटकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची जबाबदारी स्वीकारण्याची प्रक्रिया आहे. या विचाराला अनुसरून विनायक काकड यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली आहे.

सध्या ते अझीम प्रेमजी विद्यापीठ, बेंगळुरू येथे उच्च शिक्षण घेत असून, समाजविकास, लोकसहभाग, सामाजिक न्याय आणि परिवर्तनवादी नेतृत्व या क्षेत्रात अभ्यास व संशोधन करत आहेत. ग्रामीण आणि शहरी समाजातील विविध प्रश्नांचा अभ्यास करून लोककेंद्रित विकास प्रक्रियेत सक्रिय योगदान देण्याचा त्यांचा मानस आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ करिअरकेंद्रित शिक्षणापेक्षा मूल्याधिष्ठित आणि समाजाभिमुख शिक्षणाची आवश्यकता अधिक आहे.

अशा वेळी समाजकार्य क्षेत्राची निवड करून उच्च शिक्षणाची वाटचाल करणाऱ्या विनायक काकड यांचा पदवीदान सोहळा हा त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

या यशाबद्दल त्यांच्यावर मित्रपरिवार, शिक्षक, सहकारी आणि शुभेच्छुकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ युवक काँग्रेसचे आंदोलन; केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी









दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ बुलढाण्यात युवक काँग्रेस, किसान आघाडी आणि विद्यार्थी आघाडीच्या वतीने जयस्तंभ चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदवत सरकारविरोधात घोषणा दिल्या. आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

दरम्यान, आंदोलन उग्र होत असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी हस्तक्षेप करत काही आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. यावेळी पोलीस आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की व झटापट झाल्याचे पाहायला मिळाले. काही वेळाने परिस्थिती नियंत्रणात आली.

युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध करत जबाबदारांवर कारवाईची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन संवादातून तोडगा काढावा, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली.

# शिक्षिका महिलेच्या हत्येचा गुन्हा उघड; मालमत्ता हडपण्यासाठी हत्या करणाऱ्या दोघांना अटक

दैनिक आपला विदर्भ



ठाणे मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशाने एका शिक्षिका महिलेची हत्या करून त्यांच्या मृत्यूनंतर मालमत्तेच्या कागदपत्रांवर वारसदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन आरोपींना कोळशेवाडी पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणाचा अवघ्या काही दिवसांत उलगडा करत पोलिसांनी आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

कोळशेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचपाडा परिसरात राहणाऱ्या सरिता मारुती चंदनशिवे या एलआयसी एजंट म्हणून काम करत होत्या. १४ जुलै २०२६ रोजी त्या एलआयसीच्या कामानिमित्त शहापूर येथे जात असल्याचे सांगून घराबाहेर पडल्या होत्या. मात्र त्यानंतर त्या घरी परतल्या नाहीत. तसेच त्यांचा मोबाईलही बंद असल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला.

या प्रकरणी सरिता चंदनशिवे यांचे भाऊ प्रवीण मारुती चंदनशिवे यांनी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. तपासादरम्यान १६ जुलै रोजी त्यांचा मृतदेह नाशिक रस्त्यावरील मेडिकल कॉलेजसमोरील सिन्नर फाटा मार्गालगत आढळून आला.

सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी दिवाकर भागुजी आहाड आणि तुषार मुरलीधर रत्नपारखी या दोन आरोपींना अटक केली.

पोलिस तपासात आरोपी दिवाकर आहाड याने सरिता चंदनशिवे यांच्याशी ओळख वाढवून त्यांचा विश्वास संपादन केल्याचे समोर आले. त्यानंतर मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशाने कट रचून त्यांची हत्या करण्यात आली. हत्या केल्यानंतर त्यांच्या नावावरील मालमत्तेच्या कागदपत्रांवर वारसदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्याचा प्रयत्न केल्याचे तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना पुढील तपासासाठी पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सहपोलीस आयुक्त पंजाबराव उगले, पोलीस उपायुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा आणि कोळशेवाडी पोलिसांनी केली. या गुन्ह्याच्या उकलमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे आणि त्यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

वृत्तविशेष...

## पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील अंत्रीकोळी व भोकर गावासाठी टँकर मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील अंत्रीकोळी व भोकर गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

अंत्रीकोळी येथे ८६० पशुधन व १५६० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ३१ हजार २०० लिटर्स पाणी पुरवठा तसेच भोकर येथे ५७० पशुधन व २५३४ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ५७ हजार ५६० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी बुलढाणा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना अनाथ प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** महिला व बाल विकास कार्यालय यांच्यामार्फत कोविड-१९, नैसर्गिक किंवा अकस्मात कारणांमुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना अनाथ प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे. पात्र बालकांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

ज्या बालकांचे आई-वडील दोघेही नैसर्गिक, अकस्मात अथवा कोविड-१९ मुळे निधन पावले आहे आणि पालकांच्या निधनाच्या वेळी संबंधित बालकाचे वय १८ वर्षांपेक्षा कमी होते, अशा बालकांना शासन नियमानुसार अनाथ प्रमाणपत्र मिळू शकते. यासाठी अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बसस्थानकाच्या मागे, जोशी नेत्रालयाजवळ, मुठ्ठे ले-आऊट, बुलढाणा येथे संपर्क साधून प्रस्ताव सादर करावा.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे : विनंती अर्ज, आई-वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र, बालकाची शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.), बोनाफाईड प्रमाणपत्र, शाळेचा निर्गम उतारा (इयत्ता ४ थी किंवा ७ वी), जन्म दाखला, जात प्रमाणपत्र, अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र, आधार कार्ड, आई-वडिलांचे आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड किंवा अन्य ओळखपत्र, कोविड-१९ मुळे मृत्यू झाल्यास संबंधित रुग्णालयाचा कोविड मृत्यू अहवाल (आवश्यक असल्यास), बालकाचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र.

पात्र बालकांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून शासनाच्या या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

## गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्यासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज मागविले

**बुलढाणा । प्रतिनिधी :** अनुसूचित जातीतील गटई काम (कातडी सोलणे तसेच त्यापासून चपला, जोडे तयार करणे) करणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील गटई कामगारांसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करून देण्याच्या योजनेअंतर्गत अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत समाज कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे प्रत्यक्ष अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी व अनुसूचित जातीतील असणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८० हजार रुपये, तर शहरी भागातील १ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे. उत्पन्नाचा तहसीलदारांनी दिलेला दाखला जोडणे बंधनकारक आहे. अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे.

याशिवाय, ज्या ठिकाणी स्टॉल उभारावयाचा आहे त्या जागेचा अधिकृत ताबा असल्याचे ग्रामपंचायत, नगर परिषद, महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट बोर्ड अथवा स्वतःच्या मालकीचे कागदपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, रहिवासी दाखला आदी आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती जोडाव्या लागतील.

विहित नमुन्यातील अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथून विनामूल्य उपलब्ध होणार आहेत. अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून ३१ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. उशीरा प्राप्त झालेले अथवा अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्जातील त्रुटींबाबत कार्यालयाकडून स्वतंत्र सूचना दिली जाणार नसल्याने अर्जदारांनी संपूर्ण व परिपूर्ण अर्ज सादर करावा, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

# जनताच सरकारची खरी मालक : आ. सिद्धार्थ खरात

### छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात १२०० हून अधिक नागरिकांना विविध योजनांचा लाभ

### मेहकर-लोणार मतदारसंघातील लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड, घरकुल, आयुष्मान कार्ड, आर्थिक मदत आदींचे थेट वितरण









**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर । प्रतिनिधी :** महसूल मंत्री यांच्या आदेशान्वये व विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली मेहकर विधानसभा मतदारसंघात आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व महसूल समाधान शिबिर बुधवारी भूमिपुत्र खा. प्रतापराव जाधव शेतकरी भवन, कॉटन मार्केट रोड, मेहकर येथे उत्साहात पार पडले. या भव्य शिबिरात विविध शासकीय विभागांच्या १५ स्टॉलच्या माध्यमातून एकाच ठिकाणी नागरिकांना अनेक योजनांचा लाभ देण्यात आला. सुमारे १२०० लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला, तर जवळपास २०० नागरिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आमदार सिद्धार्थ खरात यांनी अभिवादन केले.

या शिबिराचे प्रमुख आकर्षण ठरले ते मेहकर-लोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांची उपस्थिती आणि नागरिकांशी साधलेला थेट संवाद. विविध विभागांच्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा, यासाठी त्यांनी प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या. तसेच प्रत्येक नागरिकाला शासनाच्या योजनांचा पारदर्शक व वेळेत लाभ मिळणे हीच लोकप्रतिनिधींची खरी जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास माजी आमदार संजय रायमुलकर, समाधान शिबिर अभियानाचे विभागप्रमुख आकाश सास्ते, नगराध्यक्ष किशोर गारोळे, निंबाजी पांडव, युवासेना तालुका प्रमुख अँड. आकाश घोडे, रविंद्र जोगी, उपविभागीय अधिकारी प्रशांत सानप, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी निलेश मडके, तहसीलदार भूषण पाटील, तहसीलदार दिनकर खरात, गटविकास अधिकारी रामराजे कापरे, मुख्याधिकारी किशोर काळे, तालुका कृषी अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

शिबिरात पारधी समाजातील लाभार्थ्यांना २५० जात प्रमाणपत्रांचे, तर इतर लाभार्थ्यांना ४०० विविध दाखल्यांचे थेट वितरण करण्यात आले. याशिवाय शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना आर्थिक मदत, संजय गांधी निराधार योजनेतील मंजुरीपत्रे, रेशन कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, घरकुल मंजुरी, बचत गटांना धनादेश, एसटी सवलत पास, एनसीएमसी कार्ड, जमिनीच्या सनदा, आधार कार्ड, कृषी साहित्य, मत्स्यबीज वाटप आदी विविध योजनांचा लाभ देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार प्रविण देशमुख व योगेश्वरी परळीकर यांनी केले, तर सूत्रसंचालन पत्रकार सिद्धेश्वर पवार यांनी केले.

### जनताच सरकारची खरी मालक आमदार सिद्धार्थ खरात

शिबिरात मार्गदर्शन करताना आमदार सिद्धार्थ खरात यांनी लोकशाहीतील जनतेच्या सर्वोच्च स्थानावर भर दिला. ते म्हणाले, सरकारचे खरे मालक अधिकारी नाहीत, आमदार नाहीत, कर्मचारीही नाहीत; सरकारची खरी मालक जनता आहे. जनताच सरकारला सत्तेवर बसवते आणि जनताच खाली उतरवते. जो चांगले काम करतो, त्यालाच जनता पुन्हा संधी देते. त्यामुळे कोणालाही अहंकार बाळगण्याचे कारण नाही. मी आज आमदार आहे, पण कायमचा नाही. लोकशाहीत कामगिरीच्या जोरावरच जनतेचा विश्वास मिळतो. कोणतेही सरकार जनतेसाठी चांगले काम करेल तर जनता साथ देईल; अन्यथा जनताच त्यांना घरचा रस्ता दाखवेल. या वक्तव्याला उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ अमरावतीत प्रहारचे भर पावसात लोटांगण आंदोलन








**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती। प्रतिनिधी :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ अमरावतीत प्रहार सामाजिक संघटनेने आक्रमक आंदोलन छेडले.

आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांनी भर पावसात लोटांगण घालत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून केंद्र सरकार व दिल्ली पोलिसांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

हातात फलक घेऊन रस्त्यावर उतरलेल्या आंदोलकांनी विद्यार्थ्यांवर बलप्रयोग केल्याचा निषेध व्यक्त करत संबंधित दिल्ली पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांच्या न्याय्य आंदोलनाला दडपशाहीने उत्तर देणे लोकशाहीला शोभणारे नाही, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

यावेळी प्रहार सामाजिक संघटनेचे प्रवक्ते जितेंद्र दुधाने यांनी सरकारवर टीका करत, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याऐवजी त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. देशभरातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

भर पावसातही मोठ्या संख्येने कार्यकर्ते व विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. आंदोलनानंतर प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संगणक-आधारित परीक्षा पद्धती लागू करण्याचा निर्णय जुलै २०२७ पर्यंत स्थगित

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई। प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने घेण्याचा निर्णय जुलै २०२७ पर्यंत स्थगित केला आहे. याबाबत आयोगाने शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

आयोगाने २५ जून २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे २०२७ पासून या परीक्षा वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने आयोजित करण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र विविध उमेदवारांकडून प्रस्तुत परीक्षा प्रचलित पद्धतीने (ओएमआर) आधारीत घेण्यासंदर्भात प्राप्त झालेली निवेदने विचारात घेऊन महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित (सीबीटी) पद्धतीने आयोजित करण्याबाबतचा निर्णय जुलै, २०२७ पर्यंत स्थगित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

# दिल्लीतील लाठीचार्जच्या विरोधात बुलढाण्यात जोरदार आंदोलन

### NEET पेपरलीक प्रकरणातील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा निषेध; शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** दिल्लीतील जंतरमंतर येथे NEET पेपरलीक प्रकरणातील जबाबदारी निश्चित करून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ आज बुलडाणा शहरातील जयस्तंभ चौक येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या अ‍ॅड. जयश्री शेळके, जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत आणि सहसंपर्क प्रमुख डी. एस. लहाने यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत विद्यार्थी, तरुण वर्ग, महिला तसेच सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आंदोलनादरम्यान केंद्र सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा तीव्र निषेध व्यक्त करत NEET पेपरलीक प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा विश्वास कायम राखण्यासाठी केंद्र सरकारने पारदर्शक व जबाबदार भूमिका घ्यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.